अर्धसाप्ताहिक
# ब्रम्हपुरी समाचार
संपादक अशोक भैया
RNI No. MAHMUL/2016/69789
E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com
Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25
गुरुवार, दि. 07 ऑगस्ट 2025 | वर्ष 10 वे | अंक 53 वा | ब्रम्हपुरी | पाने 6 | किंमत 2 रूपये

# नवोदित कंत्राटदार मरणाच्या वाटेवर!

## मोठ्या टेंडरचा बाजार कोण थांबवणार...

ब्रम्हपुरी/का.प्र.

राज्याच्या सार्वजनिक बांधकाम क्षेत्रात एक विषारी प्रथा रुजली आहे. मोठी कंत्राटे मिळवायची, टक्केवारीची मलई खाऊन ती लहान कंत्राटदारांच्या माथी मारायची आणि शासनाकडून देयके थकल्यावर हात वर करायचे, या दुष्टचक्रात अनेक होतकरू अभियंते भरडले जात आहेत. कोल्हापूर-पुणे महामार्गावरील तांदुळवाडी (जि. सांगली) येथील तरुण अभियंता हर्षल पाटील याची आत्महत्या हे याच भ्रष्ट व्यवस्थेचे क्रूर वास्तव आहे. या प्रकरणानंतर सार्वजनिक कामांमधील 'टेंडरच्या बाजाराला' आवर घालणार कोण? हा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

हर्षल पाटीलने जल जीवन योजनेअंतर्गत एका मोठ्या कंत्राटदाराकडून पोट-कंत्राटदार म्हणून काम घेतले होते. मूळ कंत्राटदाराला शासनाकडून वेळेवर पैसे न मिळाल्याने त्याने हर्षलची देणी थकवली. सावकारांचा तगादा आणि आर्थिक विवंचनेतून हर्षलने आपले जीवन संपवले, यावर, हर्षलच्या मृत्यूचा आणि थकित पैशांचा शासनाशी संबंध नाही, असे सांगून उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी हात झटकले आहेत. मात्र, मूळ कंत्राटदाराने स्वत: काम न करता ते दुसऱ्याला कसे दिले, यावर शासकीय यंत्रणा मूग गिळून गप्प आहे. मग हर्षलच्या मृत्यूला जबाबदार कोण?

### अशी चालते भ्रष्ट साखळी -

राज्यात लहान कामांऐवजी अनेक कामे एकत्र करून एकच मोठी निविदा काढण्याची पद्धत रूढ झाली आहे. यामुळे ठराविक मोठ्या कंत्राटदारांनाच कामे मिळवणे सोपे जाते. या कंत्राटदारांना अनेकदा राजकीय वरदहस्त असतो, ज्यामुळे प्रशासनाकडून त्यांना 'रेड कार्पेट' अंथरले जाते. एकदा कार्यदिश मिळाला की, मोठी 'बिदागी' घेऊन हे कंत्राटदार टक्केवारीच्या हिशोबाने लहान कंत्राटदारांच्या गळ्यात कामाची वीणा अडकवतात. यासाठी कायदेशीररित्या वटमुखत्यारपत्र दिले जाते.

### कायद्याला केराची टोपली -

मोठ्या कामांची पोट-कंत्राटे देण्याबाबत कायद्यात गंभीर तरतुदी आहेत. सर्वोच्च न्यायालयानेही अशा प्रकरणांमध्ये कामाच्या दर्जावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. कोणत्याही कंत्राटदाराला काम पोट हक्काने द्यायचे असल्यास, त्यासाठी शासनाची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक आहे. असे

(उर्वरित पान क्र. ६ वर)

### व्यवस्थेचा अजगर

**टेंडरचा बाजार : पात्रतेच्या जोरावर मोठी कंत्राटे मिळवून ती टक्केवारीवर लहान कंत्राटदारांना विकण्याचा धंदा.**

**आर्थिक पिळवणूक : शासनाकडून देयके मिळण्यास विलंब झाल्यास त्याचा भार पोट-कंत्राटदारांवर ढकलला जातो.**

**कायद्याचे उल्लंघनः शासनाच्या परवानगीशिवाय पोट-कंत्राटे देणे बेकायदेशीर असूनही सर्रास व्यवहार सुरू.**

**अभद्र युतीः मोठे कंत्राटदार, राजकारणी आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या संगनमताने व्यवस्थेवर नियंत्रण**

**तरुणांचा बळी : आर्थिक चक्रात अडकून भांडवल गमावल्याने अभियंत्यांवर आत्महत्येची वेळ.**

# सर्वसामान्यांच्या आर्थिक उत्थानाकरीता श्री बालाजी पतसंस्था कटिबध्द - अशोक भैया

ब्रह्मपुरी/का.प्र.

सर्वसामान्य व्यवसायिक, शेतकरी व वंचितांच्या आर्थिक उत्थान हे उद्दिष्ठ समोर ठेवून श्री बालाजी नागरी सहकारी पतसंस्थेची स्थापना करण्यात आली आहे. केवळ नफा कमविणे हा उद्देश न ठेवता, सर्वसामान्य नागरिकांना बचतीची सवय लागून, त्यांचा आर्थिक विकास झाला पाहिजे या उदात्त हेतूने पतसंस्थेची निर्मिती करण्यात आली. सर्वसामान्यांच्या आर्थिक उत्थानाकरीता श्री बालाजी नागरी सहकारी पतसंस्था



कटिबद्ध आहे, असे प्रतिपादन संस्थेचे अध्यक्ष अशोक भैया यांनी उद्घाटन समारंभात व्यक्त केले.

श्री बालाजी नागरी सहकारी पतसंस्थेचा उद्घाटन सोहळा आज दि. ०३ ऑगस्ट रविवारला सकाळी ११ वाजता भैय्या कॉम्प्लेक्स, टॉवर १, वडसा रोड ब्रम्हपुरी येथे मोठ्या उत्साहात पार पडला. कार्यक्रमाला उद्घाटक म्हणून डॉ.मिलींद नरोटे आमदार, गडचिरोली विधानसभा क्षेत्र, प्रमुख पाहूणे म्हणून प्रा. सुभाष बजाज सदस्य, ने हि. शिक्षण संस्था, ब्रम्हपुरी, योगेश मिसार अध्यक्ष, व्यापारी संघटना, ब्रम्हपुरी, सुभाष अग्रवाल उपाध्यक्ष, व्यापारी संघटना ब्रम्हपुरी, प्रसिद्ध उद्योजक निलेश मोहता, माजी नगरसेवक गौरव भैय्या आदी. मान्यवर उपस्थित होते.

यावेळी अशोक भैया पुढे म्हणाले की, शेतकरी, सर्वसामान्य नागरिक, व्यवसायीकांचा आर्थिक स्तर उंचाविला पाहिजे, त्यांना वेळोवेळी आवश्यक कर्जाचा पुरवठा झाला पाहिजे, तसेच छोट्या बचतीची सवय लावून त्यांची उन्नती साधण्यासाठी पतसंस्था नक्कीच फायदेशीर ठरेल. पतसंस्थेच्या माध्यमातून पुण्याई हेच लक्ष गृहित धरून या पतसंस्थेची मुहूर्तमेढ रोवण्यात आली आहे. कौशल्य, अनुशासन व कला या त्रिसुत्रीच्या माध्यमातून मिळकत व बचत केल्यास आर्थिक संपन्नता प्राप्त होऊ शकते. प्रसंगी सुप्रसिद्ध अमेरिकन उद्योजक एलान मस्क यांच्या विधानाचा अशोक भैया यांनी संदर्भ देत वक्तव्य केले.

प्रसंगी प्रा. सुभाष बजाज, सुभाष अग्रवाल यांनी मनोगत व्यक्त करून पतसंस्थेच्या उद्घाटन समारंभात शुभेच्छा प्रदान केल्या. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.मिलींद नरोटे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात वंचित घटकाला प्रवाहात आणण्यासाठी ही पतसंस्था मोलाची भूमिका बजावणार असून, जनसामान्यांसाठी सुविधा उपलब्ध करून देणारी असल्याचे म्हटले. कार्यक्रमाचे संचालन, प्रास्ताविक अतिथींचा परिचय प्रा. अभिजीत परकरवार यांनी केला, तर आभार प्रा.डॉ. प्रकाश वट्टी यांनी मानले. यावेळी शहरातील प्रतिष्ठित गणमान्य नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.




## संपादकीय...

# कोकाटेची गच्छंती टळली

राज्याचे नूतन क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे यांनी आता कुठे सुटकेचा नि:श्वास टाकला असेल. नुकत्याच पार पडलेल्या विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात सभागृहात बसले असताना कोकाटे यांनी आपल्या मोबाइलवर पत्त्यांचा डाव उघडला आणि करमणूक म्हणून दोन-चार खेळ्या केल्या. त्या नेमक्या प्रेक्षक गॅलरीतून फोनच्या कॅमेऱ्याने कोणीतरी टिपल्या. त्यावरून बराच गदारोळ झाला. कोकाटेंच्या जागी दुसरा कोणी असता, तर विषय एवढा चिघळला नसता. पण, कोकाटे हे व्यक्तिमत्त्वच कोणी हलक्यात घ्यावं असं नाही. त्यामुळे, सगळ्यांनीच त्यांना गांभीर्याने घेतलं आणि कोकाटे फसत गेले. विषय खोलात जातोय याचं भान कोकाटेंना फार उशिरा आलं. केवळ या प्रकरणातच असं नाही, स्वत:च्याच मिजाशीत वावरायची सवय असलेल्या कोकाटेंबाबत हे नेहमीच होतं. अगदी युवक काँग्रेसच्या दिवसांपासून त्यांच्यासोबत राहिलेले राजकीय नेते आणि कार्यकर्ते हेच सांगतात.

हे सरकार आल्यापासून कोकाटे मंत्रिमंडळात आहेत. याचं कारण यावेळच्या विधानसभा निवडणुकीत त्यांनी आपला मतदारसंघ त्यांच्या पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना देऊ केला म्हणून. पवार यांनी या निवडणुकीत पारंपरिक बारामती मतदारसंघाऐवजी ज्या मतदारसंघांचा विचार केला होता, त्यात अहिल्यानगर जिल्ह्यातील काही मतदारसंघांबरोबरच नाशिक जिल्ह्यातील सिन्नर विधानसभा मतदारसंघाचाही समावेश होता. सिन्नरची हवा जोखण्यासाठी त्यांनी या मतदारसंघात त्यावेळी लागोपाठ दौरेही केले होते. पवार यांच्या त्या मनसुब्याचे कोकाटे यांनी स्वागतच केलं होतं. आपल्या हातातला मतदारसंघ पवार यांच्यासाठी सोडण्याची बिनशर्त तयारी दाखवल्याने साहजिकच कोकाटे यांच्या गुणांत वाढ झाली. त्यातूनच त्यांचा मंत्रिमंडळ प्रवेश नक्की झाला! जे मनात असेल ते बोलून टाकण्यात कोकाटे मागेपुढे पाहात नाहीत. राजकारणात हा गुण बहुधा अडचणीचाच ठरतो. त्यामुळे, मंत्रिमंडळात आल्यानंतरही कोकाटे यांनी आपल्या पूर्वीच्याच लौकिकात अधिक भर टाकण्यास सुरुवात केल्यानंतर ते चांगलेच अडचणीत आले. त्यासाठी त्यांना पक्षप्रमुखांकडून खडे बोलही ऐकावे लागले. मुख्यमंत्र्यांनी उघड नाराजी व्यक्त करून झाली. पण म्हणतात ना, 'मारणाऱ्याचा हात धरता येतो, बोलणाऱ्याचं तोंड कसं धरणार?' अगदी तशीच गत कोकाटे यांच्याबाबतही झाली. 'शेतकरी भिकारी नाही. मला तसं म्हणायचं नव्हतं. माझ्या विधानाचा विपर्यास झाला' असा खुलासा करताना कोकाटे यांनी 'शेतकरी कसला भिकारी? सरकार भिकारी' असा खुलासा करून स्वत:लाच आगीतून फुफाट्यात नेऊन टाकलं! त्याचा धुरळा खाली बसत नाही तोवर हे पत्त्यांचं प्रकरण समोर आलं. त्यातही खुलासा करताना 'बुडत्याचा पाय खोलात' अशीच गत झाली.

'मोबाइल सुरू करताना रमीचा डाव 'पॉप-अप' झाला' या त्यांच्या खुलाशानंतर विधिमंडळाने केलेल्या तपासात त्यांच्या मोबाइलवर रमीचा डाव किती वेळ चालला होता इथपासून त्यांच्या या क्रीडानंदाचे चित्रीकरण कुठून केलं गेलं? इथपर्यंत सगळ्याच बाबी उघड झाल्या. यावेळीही केवळ तेच अडचणीत आले नाहीत. त्यांच्या पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, प्रवक्ते, पवार असे सगळेच अडचणीत आले. त्या सगळ्यांनीच अगदी कठोर प्रतिक्रिया दिल्या. त्यावरून 'कोकाटे यांची गच्छंती नक्की' अशा प्रकारच्या बातम्याही काही अतिउत्साही माध्यमांनी चालवल्या. पण, तसं घडणं अवघड होतं. कारण, त्याचवेळी अन्यही काही मंत्र्यांच्या तशाच वादग्रस्त बाबी सुरू होत्या. त्यांच्यावर शिस्तभंगाची किंवा औचित्यभंगाची कारवाई होण्याची चिन्हं नव्हती. जर त्यांच्यावर कारवाई नाही, तर एकट्या कोकाटेंवरच कारवाई कशी होणार? राजकारणातली गणितं आणि समीकरणं अशीच वेगळी असतात. त्यामुळे, कोकाटे वाचले. केवळ खाते बदलावर, शिक्षा म्हणून कमी महत्त्वाचं खातं स्वीकारून कोकाटेंनी स्वत:ची मान सोडवून घेतली, असंच चित्र बाहेर आले.

# वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन ही काळाची गरज

## ने.हि. महाविद्यालयात वृक्षारोपण : अशोक भैया यांचे प्रतिपादन



ब्रह्मपुरी/का.प्र.

'आज पर्यावरणातील बदल हे कशाचे प्रतीक आहे तर बेसुमार झाडांची झालेली कत्तल आहे. त्यामुळे दिवसेंदिवस तापमानात मोठी वाढ दिसते आहे. वृक्ष केवळ तापमान कमी करण्याचे काम करित नाही तर शुध्द ऑक्सीजन देत असतात सोबत वाटसरुला सावली, फळ व पाऊस पडण्यासाठी मदत करतात. तापमानाचे संतुलन करतात. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी जी यांनी 'एक पेड माँ के नाम' या उपक्रमाची सुरुवात करुन जास्तीत जास्त झाडे लावा व जगवा हा संदेश देत आहेत, ते याच कारणामुळे! म्हणून झाडाचे येणाऱ्या काळात महत्त्व समजून वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन काळाजी गरज आहे' असे मौलिक मार्गदर्शन अशोकजी भैया यांनी केले.

या कार्यक्रमाचे आयोजन नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालय ब्रम्हपुरी येथिल राष्ट्रीय सेवा योजना, एन सी सी कँडेड बाईज व गर्ल्स युनिट, क्रीडा विभाग, लोकसंख्या शिक्षण मंडळाच्या वतीने आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष कार्य. प्राचार्य डॉ सुभाष शेकोकर, डॉ आर.के. डांगे, डॉ रेखा मेश्राम, डॉ असलम शेख, डॉ धनराज खानोरकर, डॉ मोहन कापगते, डॉ प्रकाश वट्टी, डॉ के. के. गील, प्रा. अभिजित परकरवार व सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

याप्रसंगी प्राचार्य डॉ सुभाष शेकोकरांनी हे महाविद्यालय केवळ वृक्षारोपणच करित नाही तर एक विद्यार्थी एक झाड दत्तक दिले जाते त्याचे संगोपन केले जाते त्यामुळे ४२ एकर परिसर निसर्गरम्य झाले आहे. हे एक जीवनमूल्यात्मक शिक्षण देवून वृक्षारोपण व संर्वधनाचे कार्य केले जाते. हे अशोकजी भैया साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली हे महाविद्यालय पुढे वाटचाल करीत आहे, असे मौलिक मार्गदर्शन केले.

प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ प्रकाश वट्टी तर आभार प्रदर्शन लेफ्ट प्रा अभिजित परकरवारांनी मानले. यशस्वीतेसाठी संजू मेश्राम, सौरभ तलमले, विपूल यांनी अथक परिश्रम घेतले.

# तहसिल कार्यालयाच्या प्रांगणातून ट्रॅक्टरची चोरी

ब्रह्मपुरी/का.प्र.

अवैध रेती तस्करी करीत असतांना, महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी कारवाई करीत ट्रॅक्टर पकडला. सदर ट्रॅक्टर ब्रम्हपुरी तहसिल कार्यालयाच्या आवारात जमा करण्यात आला. परंतु सदर ट्रॅक्टर अज्ञात चोरट्यांनी पळवून नेला. याविषयी ब्रम्हपुरी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

फिर्यादी हिमांशू संजय पांजनकर वय ३१ यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, दि. ०२/०८/२५ ला रात्री१२ वा. दरम्याण नांदगाव जाणी शिवारात एक ट्रॅक्टर अऱ्हेर नवरगाव वैनगंगा नदी पात्रातुन अवैध वाळू उत्खनन करून वाहतुक करित असताना आढळून आला. सदर चोरीचा ट्रॅक्टरचा मालक कैलास भद्रचंद कऱ्हाडे रा. अऱ्हेर नवरगाव येथील आहे. तर वाहन चालक विशाल परसराम भंडारे रा. अऱ्हेर नवरगाव येथील आहे. सदर ट्रॅक्टर चालकाकडे वाहतुक परवाना नसल्यामुळे फिर्यादी पांजनकर यांनी कारवाई करीत सदर ट्रॅक्टर तहसिल कार्यालय आवारात लावला. जप्त केलेला ट्रॅक्टर आईसर- ३३३ कंपनीचा असून सिल्वर कलरचा आहे. तसेच त्यावर कोणत्याही प्रकारचे नंबर नसुन ट्रॉली ही निळ्या रंगाची आहे. ट्रॅलीमध्ये अंदाजे ०१ ब्रास रेती होती. कारवाई केल्यानंतर जप्त केलेला ट्रॅक्टर व ट्रॉली तहसिल कार्यालय परिसरात ठेवल्यानंतर अज्ञात चोरट्यांनी ट्रॅक्टर किमत २लक्ष रुपये व ट्रॉली निळ्या रंगाची ०१ ब्रास रेती भरलेली किंमत १,०३००० रुपये असा एकुण ३ लक्ष ३ हजार रुपये चा मुद्देमाल चोरून नेला आहे.

अज्ञात चोरट्या विरूद्ध ब्रम्हपुरी पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

# वाढदिवशी अवयव दानाचा संकल्प

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी शहरातील युवा समाजसेवक उदयकुमार पगाडे या तरूणाने स्वत:च्या ३१ व्या वाढदिवसाच्या दिवशी, अवयव दानाचा संकल्प केला.

ब्रम्हपुरी येथील उपजिल्हा रुग्णालयात जाऊन, मरणोत्तर अवयव दानासाठी स्वत:च्या नावाची नोंदणी करून घेतली व समाजासमोर एक आदर्श निर्माण केला आहे.

यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. खंडाळे, डॉ.जीवने, डॉ.नागमोती आणि समुपदेशिका आंबिलडुके मॅडम हजर होत्या.

## 😂 विनोदिनी 😂

गावातील स्मशानभूमी सुंदर करून व कुंपण घालण्यासाठी गावातील तरूणांनी वर्गणी गोळा करण्यास सुरूवात केली... काही घरे फिरून वर्गणी गोळा केल्यानंतर ते गोपाळराव काकांच्या घरी आले....

वर्गणीवाले : काका... स्मशान भूमीच्या कुंपणाकरीता वर्गणी द्या...

गोपाळराव : कशाला हा उपद्व्याप...?? काही वर्गणी मिळणार नाही... काही कुंपण नको... आत गेलेला काही बाहेर येत नाही... अन् बाहेरच्याला आत जायची इच्छा नाही...!!!

# राष्ट्रवादी काँग्रेससह विविध पक्षातील शेकडो कार्यकर्त्यांचा काँग्रेस प्रवेश

## ब्रम्हपुरीतील जाणी वार्ड, हळदा, मुडझा, कुडेसावली, नांदगांव, सुरबोडी, पारडगाव येथील कार्यकर्त्यांचा समावेश

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी तालुक्यात विधीमंडळ काँग्रेस गटनेते आ.विजय वडेट्टीवार यांच्या विकासाचा झंजावात व काँग्रेस पक्षाच्या विचार सरणीला प्रेरित होऊन ब्रम्हपुरीतील जाणीवार्ड, हळदा, मुडझा, पारडगाव, कुडेसावली, नांदगाव, सुरबोडी येथील राष्ट्रवादी काँग्रेस व अन्य राजकीय पक्षाच्या शेकडो कार्यकर्त्यांनी आपापल्या पक्षाला रामराम ठोकत आमदार विजय



वडेट्टीवार यांचे उपस्थितीत काँग्रेस पक्षात प्रवेश केला. या पक्षप्रवेशाने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासह अन्य राजकीय पक्षांना ब्रम्हपूरीत मोठी खिंडार पडली आहे.

गेल्या १० वर्षापासून विधीमंडळ काँग्रेस गटनेते तथा ब्रम्हपुरी विधानसभा क्षेत्र आमदार विजय वडेट्टीवार यांनी क्षेत्र विकासासाठी शासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा करून कोट्यावधींचा विकास निधी खेचून आणला. तद्वतच संपुर्ण क्षेत्रांतील सर्व समाजाला समान न्याय, शिक्षण, आरोग्य, क्रीडा, अनेक सामाजिक कार्य यासह अत्यावश्यक मूलभूत गरजा पुर्ण करुन नागरिकांच्या अडचणी दूर केल्या. अशा विविध कार्यांना प्रेरित होऊन ब्रम्हपुरी तालुक्यासह शहरातील अनेक कार्यकर्त्यांनी आज काँग्रेस पक्षात प्रवेश केला.

सदर पक्षप्रवेश प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष वासु सोंदरकर व राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष पराग बनपुरकर, कृउबा संचालक केशव भुते यांच्या नेतृत्वाखाली पार पडला आहे. आयोजित पक्ष प्रवेशाप्रसंगी ब्रह्मपुरी तालुका काँग्रेस अध्यक्ष खेमराज तिडके, शहर काँग्रेस कमिटी अध्यक्ष हितेंद्र राऊत, माजी जिल्हा परिषद सदस्य प्रमोद चिमुरकर, माजी नगरसेवक डॉ. नितीन उराडे, युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष सोनू नाकतोडे आदींची उपस्थिती होती.

**जल है तो कल है...**

# ने.हि. कन्या विद्यालयात शिक्षक-पालक सहविचार सभा

ब्रम्हपुरी/का.प्र.

स्थानिक नेवजाबाई हितकारिणी कन्या विद्यालय, ब्रह्मपुरी येथे दिनांक ०१ ऑगस्ट




२०२५ रोज शुक्रवारला शिक्षक पालक सभेचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका बनपूरकर मॅडम होत्या. विशेष अतिथी तथा मार्गदर्शक म्हणून अशोकजी भैया सचिव, नेवजाबाई भैय्या हितकारिणी शिक्षण संस्था, ब्रह्मपुरी, प्रमुख अतिथी म्हणून उपमुख्याध्यापक निखारे सर, पर्यवेक्षिका खंडाते मॅडम तसेच पालक प्रतिनिधी उपाध्यक्ष भूमराजजी सहारे आणि प्रतिभाताई लाखे विचार मंचावर उपस्थित होते.

पालक शिक्षक सहविचार सभेची गरज, पाल्यांच्या सर्वांगीण विकासासाठी किती महत्त्वाची असते हे प्रास्ताविकातून उपमुख्याध्यापक श्री निखारे सरांनी सांगितले. कार्यक्रमाचे मुख्य अतिथी तथा मार्गदर्शक अशोकजी भैया यांनी पालकांमध्ये मुलींच्या शिक्षणाविषयी जागृती निर्माण होऊन शिक्षण क्षेत्रात त्या अग्रेसर ठरत आहेत, त्याचा आपल्याला अभिमान वाटतोय. आपला पाल्य कुठेच कमी पडायला नको यासाठी आपण सर्व सुविधांची पूर्तता करण्याचा प्रयत्न करूया. ब्रह्मपुरीच्या विद्यार्थिनी उच्च शिक्षणासाठी विदेशात जात आहेत, म्हणून शिक्षण नगरी अधिकाधिक सुविधापूर्ण बनवण्याचा आपल्या संस्थेचा प्रयत्न राहील असे मत त्यांनी व्यक्त केले.

याप्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ बनपूरकर मॅडम यांनी विद्यार्थिनींना केंद्रबिंदू मानून, गुणवत्ता वाढवण्याच्या दृष्टीने अनेक उपक्रमांचे नियोजन करून ते राबवण्याचे मानस व्यक्त केला. सभेत पाल्यांच्या दृष्टीने विविध विषयावर चर्चा करण्यात आली. समस्यांबाबत सविस्तर मार्गदर्शन करून पालकांचे समाधान करण्यात आले, तसेच उपस्थित पालकांनी शाळेच्या उत्तम प्रगती व गुणवत्तेबाबत मनापासून अभिनंदन व्यक्त केले. याप्रसंगी बहुसंख्य पालक उपस्थित होते. याप्रसंगी 'शालेय दर्पण' अंतर्गत चित्रफीतींद्वारे शालेय प्रगतीचा आढावा आलेखित करण्यात आला. पालक सभेचे संचालन नगराळे मॅडम तथा आभार प्रदर्शन उंदीरवाडे मॅडम यांनी केले.

❀❀❀❀❀❀

# पत संस्था ही कर्मचाऱ्यांकरीता सुरक्षा कवच - डॉ. सुभाष शेकोकर

## ने.हि. सेवक पत संस्थेची ४८ वी वार्षिक आमसभा

ब्रम्हपुरी/का.प्र.

'आज पत संस्था कर्मचारी बांधवांसाठी खुप मोठी आधार आहे. कारण अगदी पटकन गरजेनुसार लागणारा पत हा पत संस्थेव्दारा उपलब्ध होत असतो. हेच पत एखाद्या बँकेकडून घेतांना सतरा प्रकारचे कागदोपत्रे जमा करणे यात खुप संघर्ष करावे लागते. त्यात वेळ जात असते. त्याऐवजी आपली पत संस्था असली तर एकाच दिवसात कर्जाचे अर्ज करुन तेवढा पत उपलब्ध करता येते त्यामुळे पतसंस्था ही ख-या अर्थाने कर्मचाऱ्यांची सुरक्षा कवच म्हणून काम करते असे मत ४८ व्या वार्षिक आमसभा नेवजाबाई हितकारिणी सेवकांची पत संस्था ब्रम्हपुरी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून डॉ. सुभाष शेकोकर यांनी व्यक्त केले.

यावेळी विचार पीठावर उपस्थित नेवजाबाई हितकारिणी सेवकांची पत संस्थेचे अध्यक्ष डॉ. प्रकाश वट्टी, उपाध्यक्ष डॉ. राहुल मोहुर्ले, सचिव आलोक मेश्राम संचालक मंडळ सर्वश्री डॉ. मोहन कापगते, डॉ. सुनिल चौधरी, डॉ. युवराज मेश्राम, प्रा. बालाजी दमकोंडवार, प्रा. अभिमन्यू पवार , राजु मेश्राम, विनय भागडकर, जयंत महाजन व कु. प्रज्ञा मेश्राम इ. मान्यवर उपस्थित होते. यावेळी पतसंस्थेचे अध्यक्ष डॉ प्रकाश वट्टी यांनी आपली पत संस्था ही प्रगती वाटेवर आहे श्रेणी अ गटात स्थान प्राप्त केली आहे. तसेच आमसभेत चर्चा केलेल्या प्रश्नावर विचार करुन प्रस्ताव निबंधक कार्यालयात सादर करुन येणाऱ्या काळात संचालक मंडळ सर्व प्रश्न मार्गी लावले जातील असे आमसभेत आश्वासन दिले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संचालक डॉ. मोहन कापगते यांनी केले तर डॉ. राहूल मोहुर्ले यांनी आभार मानले. सभा यशस्वी करिता राजु ढोरे व सर्व संचालक मंडळ आणि विजु, प्रकाश यांनी सहकार्य केले.

- ब्रम्हपुरी समाचारमध्ये जाहिरात प्रसिध्दीसाठी संपर्क करा -
महेश पिलारे मो. 9503100964
प्रा. विजय मुडे सर मो. 8275715315

# लो. टिळकांनी स्वातंत्र्याची गर्जना केली - श्रीपाद अपराजित

ब्रह्मपुरी/का.प्र.

'लोकमान्य टिळकांनी स्वातंत्र्यासाठी, समाजाला जागृत करण्यासाठी लेखनी हातात घेतली. साहित्यातून समाजप्रबोधन, देश भक्ती, स्वातंत्र्य चळवळ, संघटित कार्य यांना चालना मिळाली. त्यांच्या वृतपत्रातील अग्रलेख समाज मनाची वाचा फोडणारे असत. लोकमान्य टिळकांनी केसरी हे मराठी वृत्तपत्र सुरू केले. या माध्यमातून त्यांनी स्वराज,



स्वाभिमान, आणि राष्ट्रवाद यांची बीजे पेरली. ब्रिटिश सरकारच्या अन्यायकारक कायद्यांवर त्यांनी निर्भीडपणे टिका केली. लोकमान्य टिळकांना निर्भीड लेखनामुळे त्यांना तुरुंगवास सुध्दा भोगावा लागला. विविध पंथ परंपरा आणि श्रध्दा अंगीकारुनही हिंदू धर्म टिकुन राहिला आहे. त्यांच्या दृष्टीने हिंदू धर्म हीच भारताच्या सांस्कृतिक आणि राष्ट्रीय ओळखीचे पायाभूत शक्ती आहे, असे प्रतिपादन ब्रह्मपुरी येथील लोकमान्य टिळक वाचनालयात लोकमान्य टिळक पुण्यतिथी निमित्त श्रीपाद अपराजित यांनी केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष यांनी लोकमान्य टिळकांवर मार्मिक विचार व्यक्त केले. याप्रसंगी मंचावर वाचनालयाचे अध्यक्ष तथा कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य सतिशराव शिनखेडे तर वाचनालयाचे सचिव भार्गवदत्त कात्यायन हे प्रमुख अतिथी होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व परिचय भार्गवदत्त कात्यायन यांनी तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रंथपाल राजेश देउरकर यांनी तर आभार मोहन राजनकर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता वाचनालयाचे सहा. ग्रंथपाल चंद्रभान पानसे, लिपिक मनीष नाकतोडे, शिपाई दिपक नागरिकर यांनी परिश्रम घेतले.

# एलएमबी स्कूलचे प्रिंसिपल कादिर कुरेशी जिल्ह्यातील सर्वोत्कृष्ट प्राचार्य




ब्रम्हपुरी/का.प्र.

दिनांक ३१ जुलै २०२५ रोजी Science Olympiad Foundation तर्फे सन २०२४-२५ या वर्षाचा जिल्ह्यातील सर्वोत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार कादिर कुरेशी सर यांना प्राप्त झाला. ने. हि. शिक्षण संस्थेचे सचिव व एल. एम. बी. पब्लिक स्कूलचे अध्यक्ष अशोकजी भैया सर यांच्या हस्ते मानचिन्ह, प्रमाणपत्र व रोख रक्कम प्रदान करण्यात आली. कादिर कुरेशी सर २०१६ पासून एल. एम. बी. पब्लिक स्कूल ब्रम्हपुरी येथील प्राचार्यपदाची धूरा उत्तम प्रकारे सांभाळत आहेत.

सरांच्या अंगी असलेले नेतृत्वगुण कर्तव्यदक्षता, त्यांची सहृदयता व दुरदृष्टी याचा प्रत्यय त्यांच्या कार्यशैलीतून वेळोवेळी जाणवतो. विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रोत्साहन व मार्गदर्शन सरांकडून सातत्याने मिळते. वेगवेगळ्या स्पर्धा परीक्षा, क्रिडा स्पर्धा विज्ञान स्पर्धांचे महत्व पटवून त्यामध्ये सहभाग घेण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रेरीत करण्याचे कार्य अव्याहतपणे सरांकडून घडत असते. गेल्या अनेक वर्षापासून SOF Olympiad तर्फे घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षेमध्ये एल.एम.बी. पब्लिक स्कूलचे अनेक विद्यार्थी यशाचे मानकरी ठरले आहेत. अद्ययावत तंत्रज्ञानाबद्दल विद्यार्थी व शिक्षकांना जागृक करण्याचे कार्य तत्परतेने सर करतात.

प्राचार्य कादिर वहाब कुरेशी सरांच्या या पुरस्कारामुळे एल. एम. बी. पब्लिक स्कूलच्या यशात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला. या प्रसंगी एल. एम. बी. पब्लिक स्कूलचे अध्यक्ष अशोकजी भैया सर, संचालिका आशिता भैया मॅडम, उपमुख्याध्यापिका रश्मी राठी मॅडम, पर्यवेक्षिका रश्मी झोडे मॅडम यांचेसह शिक्षकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचारीगण यांचेकडून कादिर कुरेशी सरांचे अभिनंदन करण्यात आले. या पुरस्कारामुळे कुरेशी सरांवर सर्व स्तरातून कौतुक व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

**झाडे लावा, झाडे जगवा**

# ने.हि. महाविद्यालयात ११वीच्या विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव

ब्रम्हपुरी/का.प्र.

नेवजाबाई भैया हितकारिणी एज्युकेशन सोसायटीच्या एन. एच. ज्यूनियर कॉलेज, ब्रह्मपुरी येथे इयत्ता ११ वीचा प्रवेशोत्सव २०२५-२६ मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.



या विशेष कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून अशोकजी भैय्या, सचिव, एन. बी. एच. एज्युकेशन सोसायटी, यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. या प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कॉलेजचे कार्यकारी प्राचार्य डॉ. एस. एम. शेकोकार होते. तसेच, एन. एच. ज्युनियर कॉलेजचे पर्यवेक्षक आनंद भोयर, प्रा विनोद नरड, व कनिष्ठ महाविद्यालयातील समस्त प्राध्यापक वृंद यांची उपस्थिती होती.

प्रवेशोत्सव कार्यक्रमात प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना नव्या शिक्षण प्रवासासाठी शुभेच्छा देत, शिक्षणात नवे तंत्रज्ञान आणि आधुनिक मूल्यांची कशी सांगड घालावी, याबाबत मार्गदर्शन केले. कॉलेजच्या यशस्वी परंपरेचा मागोवा घेत, नवगत विद्यार्थ्यांनी प्रेरणा घेऊन गुणवत्ता आणि शिस्तीचा आदर्श निर्माण करण्याचे आवाहन करण्यात आले. एन. एच. ज्युनियर कॉलेज ब्रह्मपुरी ही संस्था प्रगत शिक्षण पद्धतीसाठी ओळखली जाते आणि यंदाही नव्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात प्रेरणादायक वातावरणात झाली. कार्यक्रमाचे संचालन प्रा.डॉ. राहुल मोहुर्ले यांनी तर प्रा. कोमलकांत ठोबरे यांनी आभार व्यक्त केले.

# पाशा पटेल यांची प्रा. देशकर यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट



ब्रह्मपुरी/का.प्र.

भाजपाचे नेते, राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष (कॅबिनेट मंत्री दर्जा) पाशाभाई पटेल यांचे माजी आमदार प्रा. अतुलभाऊ देशकर यांच्या निवासस्थानी आगमन झाले. यावेळी गडचिरोलीचे आमदार डॉ. मिलिंद नरोटे यांचे सुद्धा आगमन झाले. या प्रसंगी प्रा. अतुल देशकरयांनी पाशा पटेल व आमदार डॉ. मिलिंद नरोटे यांचे शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

संपूर्ण देशात 'Bamboo Man Of India' म्हणून ओळख असलेले पाशाभाई पटेल यांचा बांबू व शेती वरील अभ्यास दांडगा आहे. यावेळी भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# आम. बंटी भांगडिया यांची ब्रम्हपुरी एसडीपीओ कार्यालयाला भेट



ब्रम्हपुरी/का.प्र.

दि. ०१/०८/२०२५ रोजी चिमुर विधानसभा क्षेत्राचे लोकप्रिय आमदार किर्तीकुमार उर्फ बंटीभाऊ भांगडीया हे ब्रम्हपुरी तालुका दौऱ्यावर असताना त्यांनी ब्रम्हपुरी येथील उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालयाला भेट दिली.

यावेळी दिनकर ठोसरे उपविभागीय पोलिस अधिकारी यांच्याशी चर्चा करताना चिमुर विधानसभा क्षेत्रातील नागभीड तालुका व अऱ्हेर-नवरगाव जि. प. क्षेत्रातील कायदा व सुव्यवस्थेचा आढावा घेतला आणि आगामी सण-उत्सवाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना गैरसोय होणार नाही याकरिता कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याची सुचना केली. यावेळी बानबले पोलीस निरीक्षक ब्रम्हपुरी, भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# शैक्षणिक कर्ज घेण्याकरीता ओबीसींची उत्तम उत्पन्न मर्यादा हटविण्याच्या निर्णयाचे स्वागत

ब्रम्हपुरी/का.प्र.

ओबीसी विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्ज घेण्यासाठी नोकरदार पालकाचे वार्षिक उत्पन्न आठ लाखाच्या वर नाही असे प्रमाणपत्र पूर्वी घ्यावे लागत होते. यामुळे हजारो विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी कर्ज घेऊ शकत नव्हते. राज्य सरकारने आता ही अट रद्द केली आहे आणि यामुळे आता ओबीसी मुलांच्या पालकांना केवळ नॉन क्रिमिलियर प्रमाणपत्राच्या आधारावर शैक्षणिक कर्ज घेण्याचा अतिशय महत्त्वाचा निर्णय महायुती सरकारने घेतला आहे.

महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळातर्फे राज्य, देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी बँकेमार्फत मंजुर केलेल्या २० लाखापर्यंत कर्जाच्या रकमेवरील व्याज परतावा महामंडळाकडून दिला जातो. यासाठी कमाल मर्यादा दहा लाख व परदेशी अभ्यासक्रमासाठी कर्ज मर्यादा वीस लाख रुपये आहे.

या लोकोपयोगी निर्णयाबद्दल भाजपा ओबीसी मोर्चा प्रदेश सचिव प्रा. प्रकाश बगमारे यांनी ओबीसी बांधवांच्या वतीने महायुती सरकारचे आभार व्यक्त केले आहे व ओबीसी प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी या संधीचा फायदा घ्यावा, असे आवाहन केले आहे.

# सुवार्तिक वासेकरांना सपत्निक समाज भूषण पुरस्कार

ब्रम्हपुरी/का.प्र.

चिटणनिस सेंटर, सिव्हिल लाईन्स, नागपूर येथे व्हीआयएसएव्ही ह्युमन राईट्स अँड इन्फॉर्मेशन राईट्स असोसिएशन आणि दर्पण पत्रकार, संपादक फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने समाज भूषण पुरस्कार सोहळाअत्यंत उत्साहात आणि यशस्वीरित्या पार पडला. या भव्य सोहळ्यात संपूर्ण महाराष्ट्रातील आदर्श शिक्षक, उत्कृष्ट पत्रकार, तसेच निःस्वार्थपणे समाजसेवेत कार्यरत असलेल्या व्यक्ती व संस्थांना 'समाज भूषण पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले.

प्रसंगी सुवार्तीक के. वासेकर आणि त्यांची पत्नी वनिता (रेबेका) वासेकर यांना समाज भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या सोहळ्याचे उद्घाटन आमदार संदीप जोशी, श्रीमंत मुदोजी राजे भोसले, रमेश बोरकुटे, हरिशंकर शुक्ल (राष्ट्रीय अध्यक्ष, अखिल भारतीय ग्राहक उत्थान संघटना), तसेच ज्येष्ठ पत्रकार डी. के. अरिकर (चंद्रपूर) यांच्या उपस्थितीत पार पडले.

# ४ लाखांचा भंगार माल घेऊन ट्रक चालक फरार

ब्रह्मपुरी/का.प्र.

भंगाराच्या मालाची वाहतूक करण्यासाठी मोबाईल ॲप वरून बूक केलेला ट्रक भंगाराचा माल घेऊन फरार झाल्याची घटना ब्रम्हपुरी येथे नुकतीच उघडकीस आली. त्यामुळे भंगार व्यवसायिकाला ४ लाख रूपयांचा आर्थिक फटका बसला आहे.

ब्रम्हपुरी पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, रमेश नंदनवार यांचे राहूल लोहा स्क्रप ट्रेडर्स नावाचे कहाली खंडाळा रोडवर भंगाराचे दुकान आहे. या दुकानात खरेदी केलेला भंगाराचा माल साठवून तो ट्रकने विक्रीसाठी जालना येथे पाठविला जातो. नियमित वाहतूकीसाठी ट्रक उपलब्ध नसल्यास ब्लॅक बक ट्रान्सपोर्ट या मोबाईल ॲपवरून ट्रक बुक करून रमेश नंदनवार हे जालना येथे विक्रीसाठी नियमित पाठवित होते. दि.२५ जुलै २०२५ रोजी नंदनवार यांनी लोहा स्क्रप जालना येथे पाठविणे असल्यामुळे मोबाईल ॲप वरून गाडी बूक केली. सदर गाडीवर चालक सलमान शाकीर रा.जबलपूर (मध्यप्रदेश) हा होता. दुसऱ्या दिवशी राहूल लोहा स्क्रप ट्रेडर्स येथे मजूरांच्या हाताने लोहा स्क्रप भंगार गाडीत भरण्यात आले. सायंकाळी रमेश नंदनवार यांनी ट्रकचालकाकडे १२ हजार रूपये रोख दिल्यानंतर लोहा भंगार भरलेली गाडी जालनाकडे रवाना झाली. दुसऱ्या दिवशी ट्रकचालकाला कॉल करून विचारले असता, गाडीचे टायर पंचर झाल्यामुळे मालेगाव येथे थांबून असल्याचे सांगितले. परत दोन तिनदा कॉल केले असता, ट्रकचालकाचा भ्रमणध्वनी बंद दिसून आला.

लोहा स्क्रप भंगार सामानाची गाडी जालना येथे पोहचली नसल्याचे रमेश नंदनवार यांच्या लक्षात आले. ट्रकचालक सलमान शाकीर रा.जबलपूर याने लोहा स्क्रपचे भंगार सामान जालना येथे न पोहचविता ४ लाख रूपयांची आर्थिक फसवणूक केली. आरोपी सलमान शाकीर विरूद्ध ब्रम्हपुरी पोलिस ठाण्यात कलम ३१६ (३) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

# स्व. हिरालालजी भैया यांचा संस्था विकासात मोलाचा वाटा - अशोक भैया



ब्रह्मपुरी/का.प्र.

'नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेचा आज मोठा वटवृक्ष झाला आहे. या संस्थेने अनेक विद्यार्थी घडविले. अनेकांचे संसार उभे केले. या संस्थेचे माजी अध्यक्ष, माजी आमदार स्व. हिरालालजी भैयांच्या काळात संस्थेचे कार्य सर्वदूर पोहचले. त्यांचा या संस्था विकासात मोलाचा वाटा राहिला आहे', असे विचार नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेचे सचिव अशोक भैया यांनी मांडले. ते स्व. हिरालालजी भैया पुण्यतिथीनिमित्त ने.हि. महाविद्यालयात बोलत होते.

याप्रसंगी पाहुण्यांच्या हस्ते माल्यार्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्य. प्राचार्य डॉ. सुभाष शेकोकर, डॉ. रेखा मेश्राम, डॉ. राजेंद्र डांगे, डॉ. असलम शेख, डॉ. मोहन कापगते, डॉ. युवराज मेश्राम, डॉ. कुलजित शर्मा, डॉ. हर्षा कानफाडे, डॉ. प्रकाश वट्टी, डॉ. अजित खाजगीवाले, डॉ. योगेश ठाकरे, डॉ. किशोर नाकतोडे, डॉ. अतुल येरपुडे, अधीक्षक संगीता ठाकरे, प्रा. धिरज आतला, सुषमा राऊत, रोशन डांगे इत्यादी मान्यवरांनी स्व.हिरालाची भैयांना अभिवादन केले. संचालन व आभार प्रदर्शन डॉ. युवराज मेश्रामांनी केले.

# आयटकचा तालुकास्तरीय मेळावा संपन्न



ब्रम्हपुरी/का.प्र.

आशा व गटप्रवर्तक कर्मचारी युनियन (आयटक) ब्रम्हपुरी तर्फे शासकीय विश्राम गृह येथे तालुकास्तरीय कार्यकर्ता मेळावा संपन्न झाला. मेळाव्याला मार्गदर्शक म्हणून आयटक राज्य सचिव विनोद झोडगे पाटील, खोरीपा नेते जीवन बगाडे, प्रशांत डांगे, पदमाकर रामटेके सर, डेव्हिड शेंडे, संघटनेच्या तालुका अध्यक्ष वर्षा घुमे, ज्योत्स्ना ठोंबरे, उद्घाटनाप्रसंगी जिल्हाध्यक्ष विनोद झोडगे यांनी छाया बोदेले, करुणा चहांदे, अलका जिभकाटे, करुणा उरकुडे, अंजुषा डवरे, सीमा शेंडे उपस्थित होते.

उद्घाटक म्हणून मार्गदर्शन करताना विनोद झोडगे पाटील यांनी सांगितले की सप्टेंबर २०१८ पासून केंद्र शासनाने मोबदल्यामध्ये कोणती वाढ केली नसून कोरोनाच्या काळात आशा वर्कर व गटप्रवर्तक कडून महत्त्वाचे काम करून घेतल्या नंतर सुद्धा आता पर्यंत ग्रामपंचायत व नगर पंचायत कडून मार्च २०२० ते ऑक्टोबर २२ पर्यंत थकीत मोबदला दिलेला नाही. परंतु कोरोना नंतर ज्या कामाचा मोबदला मिळत असे त्या कामाचा कार्यक्रम मोठ्या प्रमाणामध्ये मोफत मध्ये शक्तीने राबवण्याचा केंद्र सरकार प्रयत्न करीत आहे. आशा वर्कर व गटप्रवर्तक यांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा देण्यात यावा याकरिता चालू वर्षात मोठे आंदोलन करण्याची गरज असल्याचे सांगितले.

आशा वर्कर व गट प्रवर्तक यांच्या चळवळीला कमजोर करण्याकरता मानधनाची तफावत ठेवून द्वेष निर्माण करण्याचा घाट महायुती सरकारने केला. त्याचे पडसाद संपूर्ण राज्यात उमटत असून राज्य शासनाला भविष्यामध्ये त्याचे परिणाम भोगावे लागतील असे त्यांनी सांगितले. केंद्र सरकार व राज्य सरकार नवीन कामगार कायदे लागु करत असून त्यामधून कामगारांना किंवा कामगार चळवळीला मोठे धोके उत्पन्न होणार असून त्याविरुद्ध केंद्र – राज्य सरकारच्या कामगार विरोधी धोरणा विरुद्ध कामगारांनी आयटक चे नेतृत्वात संघटितपणे लढा लढणे गरजेचे आहे असे वर्षा घुमे यांनी सांगितले. यावेळी तालुक्यातील शेकडो आशा व गट प्रवर्तक कर्मचारी प्रामुख्याने उपस्थित होते.

# ट्विंकल स्कूल, नागभीड येथे मासिक पाळी आरोग्य कार्यशाळा संपन्न

नागभीड/प्रतिनिधी

ट्विंकल इंग्लिश स्कूल, नागभीड येथे तालुका आरोग्य अधिकारी डॉ. विनोद मडावी यांच्या मार्गदर्शनाखाली हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना, नागभीड यांच्या वतीने मासिक पाळी आरोग्य कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

या कार्यशाळेत आपला दवाखान्याच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रियांका धाईत यांनी विद्यार्थिनींना मासिक पाळी दरम्यान घ्यावयाची काळजी, स्वच्छता आणि आरोग्यदायी सवयींबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच स्टाफ नर्स हर्ष ताराम यांनीही मुलींना आवश्यक माहिती दिली.

कार्यक्रमाच्या वेळी ट्विंकल इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या शुभांगी पोहेकर, मुख्याध्यापिका संगीता नारनवरे, रेणुका चौधरी (नर्स केअर टेकर), रीना भोयर (नर्स केअर टेकर) उपस्थित होत्या. याशिवाय आपला दवाखान्याची संपूर्ण टीम, नर्सिंग स्टाफ व विभागातील आशा वर्कर्स हजर होत्या.

**... QUOTES ...**

"If you want success, you have to start acting, feeling and being successful."

- Matt O'Grady

# रणमोचन येथील शेतकऱ्यांना डोंगा खरेदीसाठी आर्थिक मदत

ब्रम्हपुरी/का.प्र.

तालुक्यातील रणमोचन या गावातील शेतकऱ्यांची शेकडो एकर शेती ही बोढेगाव शेतशिवारात आहे. बोढेगाव शेतशिवारात जाण्यासाठी भुतीनाला ओलांडावा लागतो. मात्र यावर्षी आलेल्या पुराने डोंगा पुरात वाहून गेला. त्यामुळे आता डोंगा उपलब्ध नसल्याने रणमोचन येथील शेतकऱ्यांसमोर शेतात कसे जायचे हा मोठा प्रश्न निर्माण झाला होता.

रणमोचन येथील ग्राम काँग्रेस कमीटीच्या पदाधिकाऱ्यांनी आमदार विजयभाऊ वडेट्टीवार यांना सदर बाब निदर्शनास आणून दिली असता त्यांनी शेतकऱ्यांपुढे असलेली समस्या लगेच मिटावी म्हणून डोंगा खरेदीसाठी आपल्या स्वत:कडुन ५० हजार रुपयांची रोख रक्कम रणमोचन येथील नागरिकांना दिली. यावेळी तालुका काँग्रेस पदाधिकारी उपस्थित होते.

**चारोळी**

तुझ्यासारखी मैत्रीण असते
हिऱ्यासारखी मोलाची...
फक्त तोंड लावायचे नाही,
नाहीतर जीव घ्यायची...

रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल

# एलएमबी स्कुलमध्ये पदग्रहण समारंभ




ब्रम्हपुरी/का.प्र.

नुकतेच ब्रम्हपुरी येथील एल. एम. बी. पब्लिक स्कूल मध्ये ३१ जुलै २०२५ ला शैक्षणिक सत्रात पदग्रहण समारंभ पार पडला. शैक्षणिक सत्र २०२५-२६ करिता विद्यार्थी परिषदेची स्थापना करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून एन. एच. एज्युकेशन सोसायटी चे सचिव तथा एल. एम. बी. पब्लिक स्कूलचे अध्यक्ष अशोकजी भैया सर उपस्थित होते. शाळेच्या संचालिका आशिता भैया मॅडम, प्राचार्य कादिर कुरेशी सर, उपप्राचार्य रश्मी राठी मॅडम, पर्यवेक्षक रश्मी झोडे मॅडम तसेच सर्व शिक्षक-शिक्षिका तथा शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

विद्यार्थी परिषदेची स्थापना लोकतांत्रिक पद्धतीने करण्यात आली. त्यांमध्ये नामांकन, आवेदन, भाषण आणि मतदानाच्या माध्यामातून हेड बॉय, हेड गर्ल ची निवड झाली. हेड बॉय च्या रूपात निस्वार्थ सहारे तसेच हेड गर्ल रूपात स्वरा दमकोंडवार ची निवड करण्यात आली तसेच शाळेचे चार ग्रुप रूबी हाऊस कॅप्टन त्रिशा चौके, आभास रामटेके, उप कॅप्टन जयेश कोचे, शोर्य पुस्तोडे प्रिफेक्ट प्रजोत महाजन एमेरल्ड हाऊस कॅप्टन वेदांत शेंडे, गरिमा शर्मा, उप कॅप्टन रिशांत रामटेके प्रिफेक्ट ग्रीषा गावडे, टोपाज हाऊस कॅप्टन अनंत कापगते, प्रांजल मेश्राम, उपकॅप्टन सार्थक दोनाडकर, चैताली राऊत प्रिफेक्ट शरयु राऊत सफायर हाऊस कॅप्टन कुणाल राऊत, दीक्षा मेश्राम, उप कॅप्टन शिवम क्षीरसागर, स्वरा मेश्राम प्रिफेक्ट किश ठेंगरी यांची निवड करण्यात आली. विद्यार्थ्यांना बॅच व स्लॅश देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच त्यांचा शपथविधी समारंभ पार पाडला. यात विद्यार्थ्यांनी त्यांच्या नविन भूमिकांची मुल्ये आणि जबाबदाऱ्या पार पाडण्याचे वचन दिले. तसेच शाळेचे माजी हेड बॉय सोहम नाकाडे याने आपले मनोगत व्यक्त केले. या प्रसंगी श्री. अशोकजी भैया सरांनी निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक केले आणि विद्यार्थ्यांना नेतुत्व आणि जबाबदारीचे महत्व अधोरेखित केले तसेच त्यांना प्रोत्साहित केले. निष्पक्ष तसेच प्रामाणिक राहण्याकरिता संबोधित केले.

कार्यक्रमाचे कुशलतेने सुत्रसंचालन दानिश शेख सर यांनी केले. तसेच आभार प्रदर्शन शामली मेने मॅडम यांनी केले. पदवी प्रदान समारंभ हा एक संस्मरणीय कार्यक्रम होता. ज्याने विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व आणि जबाबदारीचे महत्व अधोरेखित केले.

Miracle constructions & Developers
श्रीराम नगरी - डेव्हलपर्स
NATP प्लॉट्स उपलब्ध
सिंदेवाही
नवरगांव
तळोधी
चंद्रपुर (चौराळा)
संपर्क : अनिल दोनाडकर
मो. 8806776699, 9834946501
डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.

प्रो.प्रा. सुरेश सोरते
मो. 8698323337
सोरते स्टेनलेस स्टील वर्क्स
गीत (बुरले) पेट्रोल पंपसमोर
नागभीड रोड, ब्रम्हपुरी
रेलींग, ग्रिल व गेट
स्टिलचे नावे बनवून मिळेल.

## नवोदित कंत्राटदार मरणाच्या...

(पान क्र. १ वरून)

असतातानाही, राज्यात परवानगीशिवाय हजारो कोटींची कामे पोट-कंत्राटदारांकडून सुरू कशी राहतात? हा प्रश्न व्यवस्थेतील सर्वांच्याच 'मिलीभगत'कडे बोट दाखवतो.

**नव्या पिढीची कोंडी -**

या 'टेंडर बाजारा'मुळे तरुण आणि नवोदित अभियंत्यांचा मोठे कंत्राटदार होण्याचा मार्गच बंद झाला आहे. शासकीय खात्यात कंत्राटदार म्हणून नोंदणी करण्यापासूनच भ्रष्टाचाराला सुरवात होते. 'लक्ष्मीदर्शन' घडवून व हेलपाटे घालून नोंदणी झाली तरी, मोठ्या कामांसाठी पात्रता नसल्याने त्यांना बड्या कंत्राटदारांचा आश्रय घ्यावा लागतो.

## नेत्यांच्या निवडणुका झाल्या, आता कार्यकर्त्यांच्या सन्मानाच्या निवडणुका

ब्रह्मपुरी/का.प्र.

भारतीय जनता पक्ष ग्रामीणच्या वतीने ५ ऑगस्ट रोजी मौजा गांगलवाडी येथील धनंजय सहारे यांच्या आवारात भाजपा संघटनात्मक बैठकीचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी आमदार प्रा.अतुलभाऊ देशकर हे होते. तर माजी जि.प. सदस्य संजयजी गजपुरे, प्रा.कादर शेख सर, डॉ.गोकुलदास बालपांडे, वंदनाताई शेंडे, माजी तालुकाध्यक्ष प्राचार्य अरुणजी शेंडे, तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर दिवटे, महामंत्री प्रा. रामलाल दोनाडकर, महामंत्री गोपाल ठाकरे इ.मान्यवर उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणामध्ये प्रा.अतुल भाऊ देशकर म्हणाले की, या अगोदरच्या ज्या निवडणुका झाल्या त्या नेत्यांच्या निवडणुका झाल्या, आता येणाऱ्या निवडणुका ह्या कार्यकर्त्यांच्या सन्मानाच्या निवडणुका आहेत. जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुकांचे पडघम वाजू लागलेले आहेत. या निवडणुकांमध्ये नेते आता कार्यकर्त्यांसाठी मेहनत घेऊन निवडून आणण्यासाठी जीवाचे रान करणार आहेत. त्यामुळे या निवडणुका महत्त्वाच्या असून या निवडणुकांसाठी सर्व बूथ प्रमुख, शक्ती केंद्रप्रमुख, तालुका कार्यकारणी सदस्य, भाजपा प्रमुख नेते आणि कार्यकर्त्यांनी स्वत:ला झोकून देऊन यापुढे काम करण्याची गरज आहे.

प्रास्ताविक प्रा.कादर शेख सर,संचालन प्रा.रामलाल महादेव दोनाडकर तर आभार तालुका सचिव विलास वाकुडकर यांनी केले.

## भरदिवसा ब्रम्हपुरीच्या गुजरीतून दिड लाख रूपये लंपास

ब्रह्मपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी शहरातील गुजरीतून भाजीपाला घेत असतांना, दुचाकीच्या टाकीच्या कव्हरवर ठेवलेले १.४० लाख रूपये अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्याची घटना ३१ जुलै २०२५ रोजी उघडकीस आली. या विषयी ब्रम्हपुरी पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

ब्रम्हपुरी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ज्ञानेश्वर पुरी वय ४२ रा. सावलगाव यांनी चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा ब्रम्हपुरीतून २ लक्ष रूपये काढले. दुसऱ्याचे ८ हजार ६०० रूपये दिल्यानंतर कॅनेरा बँकेतील खात्यात पुरी यांनी ४५ हजार रूपये टाकले. उर्वरीत १.४० लाख रूपये पुरी यांनी स्वत:जवळ ठेवले. कांदे घेण्यासाठी पुरी दुचाकीने गुजरीत गेले असता, कांद्याच्या दुकानासमोर दुचाकी उभी ठेवली. दुचाकीच्या टाकीच्या कव्हरमध्ये पुरी यांनी १.४० लक्ष रूपये ठेवले असता, अज्ञात चोरट्यांनी दुचाकीच्या कव्हरमधील १.४० लक्ष रूपये लंपास केले.

अज्ञात चोरट्या विरूद्ध ब्रम्हपुरी पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३०५ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

बुधवार बंद
दुकानाची वेळ सकाळी १० ते सायं. ६ वा.
Lubi PUMPS-MOTORS
सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता
गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी
रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी
फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053
Kirloskar
CRI
ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान
1994 पासून आपल्या सेवेत
किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता

Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404